दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती

▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३२५ वा ▶ बुधवार दि. २० सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६



# गणपती माझा नाचत आला..!

## राज्यभरात गणरायाचे आगमन



### मानाच्या खूनी गणपतीची मिरवणूक

जुने धुळे परिसरातील मानाचा खुनी गणपतीचे फुलांनी सजविलेल्या पालखीत आगमन झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीत भाविक सहभागी झाले होते. यावेळी मानाच्या खूनी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी मोठी झुंबड उडत होती. मिरवणुकीदरम्यान मानाच्या खूनी गणपतीवर फुलांची उधळण करण्यातआली. पारंपारिक पध्दतीने निघालेल्या बाप्पांची मिरवणूक लक्षवेधी ठरले.





### बच्चे कंपनीला मोदकांचे आकर्षण

**धुळे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला आजपासून (मंगळवार) धूमधडाक्यात प्रारंभ झाला आहे. राज्यभरात गणेशभक्तांनी पारंपारिक पद्धतीने वाजत गाजत आपल्या लाडक्या गणरायाला घरी आणले. घरोघरी बाप्पांची विधीवत पुजा आणि प्राणप्रतिष्ठापना केली जात आहे. दरम्यान उत्सवानिमित्त राज्यातील सर्वच बाजारपेठेत हार, फुले, मिठाई आदी साहित्यांसाठी नागरिकांची तुडुंब गर्दी आहे.

समस्त गणेशभक्तांना ज्या दिवसाची अनेक दिवसांपासून ओढ लागली होती, अखेर तो दिवस आज उजाडला आहे. परिणामी, शहरासह जिल्हाभरात गणेशोत्सवाचा अभूतपुर्व उत्साह दिसून आला. 'गणपती बाप्पा मोरया...मंगलमूर्ती मोरया, एक-दोनतीन-चार...गणपतीचा जयजयकार... असा जयघोष सर्वत्र ऐकायला मिळत असून चैतन्यमय वातावरणामुळे गणेशभक्तांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे. लाडक्या बाप्पांना घरी घेवून जाण्यासाठी सकाळपासूनच अबालवृध्दांनी मोठी गर्दी केली होती. पारंपारिक वाद्यांच्या निनादात, ढोल ताशांच्या गजरात, गुलालाची उधळण करत लाडक्या बाप्पाचे स्वागत केले जात आहे. 'श्रीं'ची विधीवत प्राणप्रतिष्ठा करुन दहा दिवस हा उत्सव सोहळा चालणार आहे. धुळे शहरातील संतोषी माता चौक, फुलवाला चौक, आग्रारोड, पारोळा चौफुली, दत्तमंदिर चौक येथे मूर्ती विक्रेत्यांनी स्टॉल लावले असून या ठिकाणी भक्तांचा मेळा फुलला आहे. मोठ्या गणेशमंडळांनी धुमधडक्यात गणेशमूर्तींची मिरवणूक काढल्याने वातावरणात प्रसन्नता, चैतन्य पसरलेले दिसून आले.

### शहरात गणरायाचे वाजत-गाजत स्वागत

धुळे जिल्ह्यात सुमारे पाचशेहून अधिक लहान-मोठ्या गणेशमंडळांकडून लाडक्या बाप्पाची प्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. सर्व गणेश मंडळांनी 'श्रीं'चे आगमन मोठ्या धुमधडाक्यात करण्याचे नियोजन केले आहे. परवापासूनच गणरायाच्या भव्य मूर्ती मंडपात दाखल होण्यास सुरवात झाली होती. अनेक मंडळांनी गणरायाची मिरवणूक काढून स्वागत केले. तर काही मंडळांनी आज सायंकाळी लाडक्या बाप्पाची वाजत-गाजत मिरवणूक काढून स्वागत करण्याचे नियोजन केले आहे. या मंडळांच्या वतीने आज गणरायाची विधीवत प्रतिष्ठापणा करण्यात येईल.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त!

गणेशोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस दलातर्फे सकाळपासूनच चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात १९०० पोलीस, १५० पोलीस अधिकारी, गृहरक्षक दलाचे ९०० जवान, राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन तुकड्या तैनात आहेत. शिवाय पुरुष व महिला स्वयंसेवकांचीही जिल्हाभरात बंदोबस्तासाठी नियुक्ती केली आहे.





चिमुकल्यांनी मोठ्या भक्तीभावाने गणपतीची मूर्ती घरी घेऊन जाताना त्यांच्या चेहर्‍यावर उत्साह झळकत होता.

### लाखोंची उलाढाल

गणरायाची प्रतिष्ठापणा करण्यासाठी घरोघरी तसेच गणेशमंडळांतर्फे गेल्या आठ दिवसांपासून सजावटीची तयारी केली जात होती. त्यासाठी बाजारपेठ सजावटीच्या साहित्याने फुलली होती. आकर्षक लाईटींग, मोत्यांची माळ, विविध प्रकारचे हार, फुलझाडे, तोरण, रंगबेरंगी पडदे, पाईप पासून बनविलेले छोटेखानी मंडप, थर्माकॉलपासून बनविलेली मंदिरे, सिंहासन, देखावे तयार करण्यासाठी लागणार्या विविध वस्तू इ.च्या खरेदीतून लाखोंची उलाढाल झाली. याशिवाय पूजा साहित्य, नारळ, वस्त्र खरेदीतूनही मोठी उलाढाल झाली. यामुळे विक्रेत्यांनी समाधान व्यक्त केले.

### बाप्पा पावल्याचे समाधान

लाडक्या बाप्पाचे वाजत-गाजत आगमन व्हावे, अशी अनेकांची इच्छा होती. परंतु, आज डफ, ढोल, ताशा वाजविणार्यांची मोठी टंचाई होती. पाच पाऊल चालत जाण्यासाठीही ५०१, ११०१, २१०० असा भाव बघायला मिळाला. अनेकांची इच्छा असूनही वाजंत्रीवाले उपलब्ध होत नव्हते. एकंदरीत वाजंत्रीवाल्यांची आज चांगलीच चांदी झाली. त्यामुळे बाप्पा पावल्याचे समाधान वाजंत्रीवाल्यांच्या चेहर्यावर झळकत होते.



## महिला आरक्षण विधेयक सादर; एकमताने विधेयक मंजूर करा, पंतप्रधान मोदींचे आवाहन

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**



लोकसभेत सादर करण्यात आलेले महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत सादर होईल तेव्हा सभागृहाने एकमताने विधेयक मंजूर करावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभेत पंतप्रधान मोदी यांनी हे आवाहन केले. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी जी-२०, महिला आरक्षण विधेयक, देशाची नवीन आणि जुनी संसद इमारतीसह अनेक मुद्यांचा उल्लेख केला.

महिला आरक्षण विधेयकाबाबत पंतप्रधान मोदी म्हणाले की, लोकसभेत महिला आरक्षण विधेयक सादर करण्यात आले आहे. हे विधेयक महिला सक्षमीकरणाशी संबंधित आहे. आम्ही मुलींसाठी सैनिकी शाळांचे दरवाजे उघडले. बेटी बचाओ बेटी पढाओ अभियान हा सरकारी कार्यक्रम राहिला नाही. तर, हे कार्यक्रम समाजाने स्वीकारले आहेत. मुद्रा योजनेपासून जन धन योजनेपर्यंत महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्व खासदारांच्या मदतीने तीन तलाक प्रथेविरोधात पावले उचलण्यात आली.

पंतप्रधान मोदी यांनी म्हटले की, जेव्हा महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत सादर होईल, तेव्हा त्यावर एकमताने निर्णय घ्यावा, अशी विनंती करण्यासाठी आज राज्यसभेत आलो असल्याचे त्यांनी म्हटले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, जुन्या इमारतीत (जुनी संसद) आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला, परंतु मला विश्वास आहे की नवीन संसदेत सुवर्ण शतक (स्वातंत्र्याची १०० वर्षे) विकसित भारताची असतील. जुन्या इमारतीत आपण पाचव्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचलो होतो, मात्र नवीन संसदेत आपण पहिल्या तीन अर्थव्यवस्थेत पोहोचू, असा मला विश्वास असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटले. आपल्याला तंत्रज्ञानाचाही विकास करावा लागेल. आता सर्वकाही ळझरव वर उपलब्ध होईल. सुरुवातीला काही सहकार्‍यांना यात अडचण येण्याची शक्यता आहे. सध्या हे डिजिटल युग आहे. अशा परिस्थितीत संसदेलाही त्याचा एक भाग बनवावा लागेल असेही पंतप्रधान मोदी यांनी म्हटले. पंतप्रधान मोदी यांनी म्हटले की, राज्यसभा सभागृह हे राज्याचे प्रतिनिधीत्व करतात. राज्यांच्या सहकार्याने सरकारने निर्णय घेतले आहेत. कोरोना महासाथीच्या काळात राज्य आणि केंद्र सरकार यांनी मिळून संघराज्यवादाची व्याख्या अधोरेखित केली असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.

## छतावर झोपणे व्यक्तीला चांगलेच भोवले

### रात्री डल्ला मारत लाखोंचा मुद्देमाल लंपास

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील बाबा नगरात एकाला छतावर झोपणे चांगलेच महागात पडले. चोरट्यांनी घरफोडी करीत रोकडसह तीन तोळे सोने आणि पाच ते सहा तोळे वजनाचे चांदीचे दागिने लंपास केले. या घटनेनंतर उशिरापर्यंत आझादनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. आझाद नगर हद्दीतील बाबा नगरातील घर नं. ११२ मध्ये शेख गफ्फुर शेख नजीर हे राहतात. ते रात्रीच्या सुमारास घराला कुलूप लावून छतावर झोपले होते. ही संधी साधत चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि लाखो रुपयांचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.

धुळे शहरात सध्या चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. चोरट्यांना जेर बंद करणे हे पोलिसांसमोर एक मोठे आव्हान उभे असतानाच आज पुन्हा शरद चोरीची घटना घडली आहे. धुळे शहरातील बाबा नगर भागात असलेल्या गफ्फुर शेख यांच्या घरात चोरट्यांनी रात्री प्रवेश करत कपाटातून ३ तोळे सोने आणि ५ ते ६ तोळे वजनाचे चांदीचे दागिने व १० ते १२ हजार रुपयांची रोकड असा लाखोंचा मुद्देमाल लंपास केला. सकाळी शेख गफ्फुर शेख नजीर हे सकाळ झाल्यानंतर कामावर जाण्यासाठी खाली आले असता घरात प्रवेश केल्यानंतर आपल्या घरात घरफोडी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ आझाद नगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. तसेच श्वान पथक, ठसे तज्ज्ञांना पाचारण केले. ठसे तज्ज्ञ धनंजय मोरे उपस्थित होते. चोरट्यांनी गजबजलेल्या भागात देखील घरांना लक्ष केले असल्यामुळे पोलिसांसमोर आता चोरट्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान असल्याच्या चर्चा शहरात होत आहे.

## नाशकात राष्ट्रवादी युवक काँग्रेसकडून गोपीचंद पडळकरांविरोधात 'जोडे मारो'





**नाशिक । प्रतिनिधी**

आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत केलेल्या चुकीच्या वक्तव्याच्या विरोधात नाशिक शहर व जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने निषेध व्यक्त करत पडळकरांच्या फोटोला जोडो मारो आंदोलन केले.

आमदार पडळकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबाबत केलेल्या चुकीच्या वक्तव्याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत निषेध व्यक्त केला. नाशिक शहरातील राष्ट्रवादी भवन कार्यालयाच्या बाहेर आमदार गोपीचंद पडळकर यांच्या फोटोला जोडे मारत आंदोलन करण्यात आले. तसेच पडळकरांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, चेतन कासव, आदित्य गव्हाणे, संदीप गांगुर्डे, अशोक पाटील, राज रंधवा, अथर्व निसाळ, आशुतोष चव्हाण, आकाश म्हस्के, ज्ञानेश्वर महाले, किरण चौधरी, गणेश हांडोरे, संतोष अढागळे, हर्षल इतापे, गणेश पगार, विकी वाळके, सुयश मेणे, पराग गांगुर्डे, राजेश हाडपे, समाधान महाले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जुने नगरसेवक निवडून येणारच नाहीत : कैलास चौधरी

**धुळे । प्रतिनिधी**



सत्ताधारी भाजपाने धुळ्याची वाट लावली आहे. मुळात धुळ्यात नगरसेवक हा शब्दच अस्तित्वात नाही. नगरसेवकांनी जनतेच्या भावनांचा चेंदामेंदा केला आहे. त्यामुळे जुने नगरसेवक निवडून येणारच नाही. असा दावा करतानाच महापालिका निवडणुक स्वबळावर लढवून सर्व नव्या चेहर्यांना संधी देवू, राष्ट्रवादी सत्तेत आल्यास दररोज दोन तास धुळेकरांना पाणीपुरवठा केला जाईल अशी ग्वाही, राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांनी दिली आहे.

शहर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नव्या कार्यालयात कैलास चौधरी यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत कैलास चौधरी म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते पक्ष सोडून गेल्याने पक्ष पोरका झाला होता. अशा परिस्थितीत इर्शादभाईंची एन्ट्री झाली. त्यांनी पक्षाला उभारी देण्याचे कधाम केले. कैलास चौधरींवर आधीच अन्याय झाला आहे. त्यामुळे त्यांना संधी दिली पाहिजे अशी आग्रही भुमीका इर्शादभाईंनी उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे मांडली. अजीतदादांनी सकारात्मक भुमीका घेत माझ्यावर शहर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. धुळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष कार्यालय कोणाच्या ताब्यात या भानगडीत आम्ही पडणार नाही. काम करण्यावर आमचा भर राहील. धुळ्यातील ८० राष्ट्रवादीचे पदाधिकारी अजीतदादांच्या गटात आहेत. हीचस्थिती राज्यभर आहे. महापालिकेत भाजपाची सत्ता असताना धुळ्यात कुठलेही काम झालेले नाही, रस्त्यांची अवस्था वाईट आहे. धुळेकरांना पाणी मिळत नाही. याआधी महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता असताना जनभावना डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादीने महापालिकेचा कारभार हाकला होता. राष्ट्रवादीने चांगले काम केले होते. राष्ट्रवादी मनपाच्या सत्तेत असताना दोन-तीन दिवसाआड पाणी मिळत होते. आता महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी सत्तेत आल्यास दररोज दोन तास पाणी जनतेला देव . राज्य पातळीवर युती असली तरी स्थानिक लेव्हलला आम्हाला पक्षाने भुमीका घेण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे आम्ही महापालिका निवडणुक स्वबळावर लढवू आणि जिंकू देखील असा विश्वास कैलास चौधरी यांनी व्यक्त केला आहे. भाजपाचे विधान परिषदेचे आमदार पडळकर यांना कुणाबद्दल काय बोलावे याच्याबद्दल भान नाही, अजितदादांबद्दल ते आक्षेपार्ह बोलले आणि गोपीचंद पडाळकरसारख्या वाचाळविरांमुळे सरकारची नाच्चकी होते. सरकारची बदनामी होते.त्यामुळे त्यांच्या पक्षाच्या नेत्यांनी त्यांना आवर घालावा. गणेशोत्सव संपल्याच्या तीन दिवसाच्या आत आ.पडळकर यांना काळे फासू असा इशाराही कैलास चौधरी यांनी केला .पत्रकार परिषद संपल्यानंतर कैलास चौधरी यांच्यासह राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आ.पडळकर यांच्या प्रतिमेला कार्यालयाबाहेर जोडे हाणून निषेध नोंदविला.या पत्रकार परिषदेला कैलास चौधरी यांच्यासोबत कुणाल पवार, सुरेश अहिरे, राजेंद्र चितोडकर, एजाज शेख, दानिश पिंजारी उपस्थित होते.

## जुन्या संसद भवनाला 'संविधान सदन' म्हणून ओळखलं जाणार : पंतप्रधान

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारताच्या इतिहासात महत्त्वाचा क्षण आहे. आजपासून नव्या इमारतीतून कामकाज होणार आहे. आजपासून दोन्ही सभागृह नव्या इमारतीतून चालणार आहे. विकसित भारताचे स्वप्न घेऊन नव्या संसदेत प्रवेश करणार आहे. या वास्तूमध्ये अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले. त्यामुळे आतापासून जुन्या संसदेला संविधान सभागृह म्हणून ओळखले जाणार आहे. भारत नव्या ऊर्जेने पुढे सरसावतोय. मी लाल किल्ल्यावरून भाषण करताना सांगितले होते हीच योग्य वेळ आहे. देश ज्या दिशेने वाटचाल करत आहे त्यानुसार अपेक्षित परिणाम मिळणार आहेत. आपण जितक्या वेगाने काम करू तितक्या वेगाने आपली प्रगती होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सेंट्रल हॉलला संबोधित करताना पीएम मोदी म्हणाले, अनेक महिला, तृतीयपंथीयांना या संसदेत न्याय मिळाला आहे. या संसदेने कलम ३७० हटवले. सेंट्रल हॉल आमच्या भावनांनी भरलेला आहे. या संसदेत ४१०० हून अधिक कायदे मंजूर झाले. जम्मू-काश्मीर आता विकास आणि शांततेच्या मार्गावर आहे. आता आम्ही नवीन संसद भवनात एका नवीन भविष्याचे उद्घाटन करणार आहे.

## आले गणराया... रंगी नाचतो...

महाराष्ट्राची तीन दैवते आहेत. एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, दुसरे पंढरीचे विठूराया आणि तिसरा अर्थातच महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्रीगणेश. यापैकी गणेशाचे आगमन आज होत आहे. श्री गणरायाची महती सर्वांना वेगळी सांगण्याची गरज नाही. भारतात काय पण जगात असा एकही देव नाही की, ज्याचा उत्सव तब्बल दहा दिवस चालतो. इतका प्रदीर्घ काळ उत्सव चालणारे हेच एकमेव दैवत. हिंदू धर्मात गणेशाला प्रथम वंदनाचे स्थान दिले आहे. हिंदूंचे कोणतेही उपक्रम हे गणेशाला वंदन केल्याशिवाय सुरू होत नाहीत. गणेशाचे अधिष्ठान असल्याशिवाय ते चांगले पार पडतील, असे कुणा सच्च्या हिंदूला वाटत नाही. साऱ्या शक्तिशाली दैवतांनीही गणेशाला अग्रक्रम देऊन त्याचा गौरव केला आहे. 'आधी वंदू तुज मोरया' असे म्हटल्याशिवाय आपल्याकडे कोणताही कार्यक्रम सुरूच होत नाही. गणेशाची महती वेगळी ती आणखी काय सांगायची. गणेशोत्सव म्हणजे मूर्तिमंत चैतन्य. चैतन्याने भारलेला हा उत्सव सर्व भारतवर्षात साजरा केला जातो. गणेश देवता ही निरलस आहे आणि तिला गरिबी, श्रीमंती, काळा की गोरा वगैरे कोणताही भेदभाव नाही. सारेच गणेशोत्सव साजरा करतात. गरिबातील गरीब असो की धनाढ्य उद्योगपती, गणेशोत्सव सारख्याच भक्तिभावाने साजरा करतात. दहा दिवस सारा भारत नुसता चैतन्याने ओसंडून वाहत असतो. गणेशोत्सव म्हणजे केवळ आनंदाचा उत्सव असतो. कोकणात तर हा उत्सव फारच थाटामाटात साजरा केला जातो. देशावर म्हणजे घाटावर तो तितक्याच उत्साहाने साजरा केला जातो.

गणेशाचे अधिष्ठान हे अत्यंत पूज्य मानले जाते. गणेश ही काही उग्र देवता नव्हे. शंकर महादेव ही उग्र देवता मानली जाते. तसे गणेशाचे नाही. तो अगदी साधाही आहे आणि प्रसंगी अगदी भक्ताची परिस्थिती पाहून जे काही असेल, ते गोड मानून घेणाराही आहे. म्हणूनच तर सामान्यांना तो आपला वाटतो. गणेश म्हणजे आपल्यातीलच एक वाटणारी देवता आहे. गणेश लोकप्रिय होण्याचे हेच एक कारण आहे. गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू करून ब्रिटिशांविरोधात जनजागृती केली, हे आता साऱ्यांना ठाऊक असते. नंतर त्या गणेशोत्सवात अनेक विकृतीही शिरल्या आणि उत्सवाला पूर्वीचे शुद्ध स्वरूप राहिले नाही, हेही साऱ्यांना ठाऊक असते, पण तो आपला विषय नाही. गणेश आणि सामान्यजन यांच्यात एक सामाजिक नाते निर्माण झाले आहे, तसे ते दुसऱ्या कोणत्याही देवतेशी निर्माण झालेले नाही. गणेशाचे अधिष्ठान हे स्वराज्यालाही होते. म्हणून छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे तोरण बांधताना गणेशाचीच पूजा केली होती. गणेश ही देवता सर्व वर्गांची, सर्व जातींची आणि सर्व वर्णांची आहे. विशिष्ट वर्गाने त्याची पूजा केली आहे, असे कधीच झाले नाही. कोणतेही कार्य सुरू करायचे असले म्हणजे गणेशाचे अधिष्ठान ठेवले जाते. त्याची पूजा करूनच कोणतेही कार्य सुरू केले जाते. हा मान गणेश देवतेला दिला जातो. बाकी कोणत्याही देवतेला हा मान नाही.

गणेशोत्सवाचे आर्थिकदृष्ट्या महत्त्वही आगळेच आहे. गणेशोत्सव दहा दिवस चालतो, म्हणून दहा दिवस आर्थिक स्थिती चैतन्यदायी असते. दहा दिवस अर्थव्यवस्था चैतन्यशील असते, त्यामुळे व्यवसाय जोरात चालतो. मंडपवाले, ध्वनिक्षेपक, हॉटेलवाले, केटरर्स, मंदिरांतील रोषणाई करणारे वगैरे लहान व्यावसायिकांना या दहा दिवसांत चांगला रोजगार मिळतो. अर्थव्यवस्थेत चैतन्य आलेले असते ते हेच. कोणताही सण इतके चैतन्य महाराष्ट्रात आणत नाही. गणेशोत्सव हा महाराष्ट्रासाठी नवीन उमेद, उत्साह आणि अर्थव्यवस्था घेऊन येतो. निवडणूक आणि गणेशोत्सव हेच दोन विषय असे आहेत की, देशात त्यांच्यामुळे अर्थव्यवस्थेला चैतन्य येते. सारी विक्री वाढलेली असते आणि व्यावसायिकांची चांदी झालेली असते. गणेशाचे धार्मिक, अध्यात्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहेच, तसे ते आर्थिकही आहे. असा सर्वांगपरिपूर्ण असा हा उत्सव असतो. माणूस कुणीही असो, तो गणेशोत्सव साजरा करणारच. त्याला अपवाद नाही. जिकडे-तिकडे गणेशाचे चैतन्याने भारलेले वातावरण असते. महाराष्ट्रात तर गणेशमूर्ती कितीतरी उंच असतात आणि त्यांच्या बनवणाऱ्यांनाही चांगले दिवस आलेले असतात. रायगड जिल्ह्यात हजारो लोक गणेशमूर्ती बनवून आपली उपजीविका चालवतात. पेणच्या मूर्ती तर आता परदेशांतही जातात, हा किस्सा जुना झाला. त्यात नावीन्य असे काही राहिले नाही.

## खानदेशातील अनमोल हिरे कॉ. शरद पाटील आणि महाराजा सयाजीराव




सयाजीराव महाराजांनी १९०६ ते १९१० या चार वर्षांसाठी श्रीधर व्यंकटेश केतकर यांना अमेरिकेतील जातीवरच्या संशोधनासाठी शिष्यवृत्ती दिली. या शिष्यवृत्तीच्या जोरावर केतकरांनी सादर केलेल्या 'द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया' या प्रबंधाला १९११ मध्ये अमेरिकेतील कोर्नेल विद्यापीठाने पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली. जातीवरचा हा जगातील पहिला पीएच.डी. प्रबंध सयाजीरावांच्या मदतीमुळेच तयार होऊ शकला. जगातील विविध धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी सयाजीरावांनी १ ऑगस्ट १९१६ रोजी बडोदा कॉलेजमध्ये तत्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. अध्यासनाचे प्रमुख म्हणून केंब्रिज विद्यापीठातील या विषयाचे विद्वान प्रा.ए.जे. विजेरी यांची नेमणूक केली. अशा प्रकारचे हे भारतातील पहिले आणि शेवटचे अध्यासन होते.

सयाजीरावांच्या सूचनेवरून व प्रेरणेने पंडित सातवळेकर यांनी लिहिलेला 'स्पर्शास्पर्श' ग्रंथ १९११ मध्ये प्रकाशित झाला. हा ग्रंथ सयाजीरावांच्या आज्ञेवरून आणि आश्रयाने दामोदर सावळाराम यंदे यांनी प्रकाशित केला होता. १९२८ मध्ये बडोदा संस्थानकडून प्रकाशित करण्यात आलेला '- ऱ्श्रीरी ूष उरींशी, ढीळलशी रपव ठरलशी खप ढहश इरीेवर डींरींश' हा ग्रंथदेखील सयाजीरावांच्या जात साक्षरतेच्या प्रयत्नांचाच भाग होता. महाराजांनी १९२८ मध्ये ढठखइएड उ-डढएड जऋ इजचइ-ध या पुस्तकाचे गोविंद मंगेश कालेलकर यांनी केलेले 'मुंबई इलाख्यातील जाती' हे मराठी भाषांतर श्री सयाजी साहित्यमालेत प्रकाशित करण्यात आले.

भारतात ज्यावेळी राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न राष्ट्रीय चळवळीच्या केंद्रस्थानी होता, त्यावेळी या प्रश्नासोबतच 'अस्पृश्यता निवारण' हा विषय हाताळणारे सयाजीराव महाराज पहिले प्रशासक होते. डॉ. आंबेडकरांच्या १९३६ मधील '-पपळहळश्ररींळेप जष उरींश' या जगप्रसिद्ध भाषण-निबंधाची पूर्वतयारी ठरणारा सयाजीरावांचा 'ढहश ऊशिींीशव उश्ररीशी' हा ऐतिहासिक इंग्रजी निबंध १९०९ मध्ये 'खपवळरप ठशींळशु' या मासिकाच्या डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाला होता. हा लेख म्हणजे आधुनिक भारतातील अस्पृश्यता निर्मूलनाचा पायाभूत दस्तऐवज आणि समतावादी जातीय ऐक्याचा जाहीरनामाच आहे.

हा निबंध तीन भागात विभागलेला आहे. पहिला भाग अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीची चर्चा करतो. दूसरा भाग अस्पृश्यतेची व्याप्ती आणि स्वरूप यावर प्रकाश टाकतो. तर तिसरा भाग या प्रश्नाच्या सोडवणूकीचे उपाय आणि गरज अधोरेखित करतो. फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका यासारख्या देशातील सामाजिक विषमतेचे संदर्भ या निबंधात आढळतात. भारतीय धर्मशास्त्राच्या चर्चेबरोबरच विविध संस्कृत ग्रंथ आणि मध्ययुगीन संत, आधुनिक काळातील अस्पृश्योद्धाराचे कार्य करणार्या विविध सुधारणा चळवळी यांचा आढावा नेमकेपणाने घेतला आहे. १९०९ मध्ये वयाच्या ४६ व्या वर्षी सयाजीरावांनी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लिहिलेला हा लेख जातीच्या प्रश्नाचे महाराजांचे वैज्ञानिक आकलन स्पष्ट करणारा होता. या निबंधात वर्णव्यवस्थेचा अंत करणारे गौतम बुद्धसुद्धा अस्पृश्यता नष्ट करण्याच्या प्रयत्नात कसे अपुरे ठरतात याची सयाजीरावांनी केलेली चर्चा पुरातत्वशास्त्र आणि प्राच्यविद्या बाल्यावस्थेत असतानाच्या पार्श्वभूमीवर वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

सयाजीराव महाराजांनी समतावादी समाजनिर्मितीसाठी बौद्ध तत्वज्ञानाला राजाश्रय दिला. परंतु संपूर्ण आयुष्यात त्यांनी हिंदू, बौद्ध किंवा अन्य कोणत्याही धर्माशी अधिकृतपणे स्वतःला जोडून घेतले नाही. परंतु बुद्धाची धर्मविषयक वैज्ञानिक दृष्टी मात्र आयुष्यभर जोपासली. असेच काहीसे धोरण कॉ. शरद पाटलांनी आयुष्यभर जोपासले. कॉ. शरद पाटील म्हणत, मी बुद्धाचा अनुयायी असलो तरी बौद्ध नाही. कॉ. शरद पाटील बुद्धाला जगातील सर्वात मोठा माणूस मानत होते. सुरुवातीला त्यांच्या अभ्यासिकेत बुद्ध, कार्ल मार्क्स, फुले, आंबेडकर यांचे फोटो होते. मात्र जीवनाच्या उत्तरार्धात बुद्ध, कार्ल मार्क्स आणि दिग्नाग यांचेच फोटो त्यांनी अभ्यासिकेत ठेवले होते. सयाजीरावांच्या अभ्यासाच्या टेबलवर बुद्धाची मूर्ती होती. हा विलक्षण 'योगायोग' आपल्याला थक्क करून सोडतो.

१९९० च्या दशकात बौद्ध तत्वज्ञान वर्णव्यवस्था अंताचा कार्यक्रम देत असून जातीव्यवस्था अंतासाठी बुद्धोत्तर असंग, वसुबंधू, दिग्नाग, धर्मकीर्ती व अश्वघोष यांचे तत्वज्ञान स्वीकारण्याची गरज असल्याची क्रांतिकारक मांडणी कॉ. शरद पाटलांनी केली. या महायान तत्वज्ञानाच्या आधारे त्यांनी 'सौत्रांतिक मार्क्सवाद' हे तत्वज्ञान आणि 'जाणीवनेणीवेचे प्रमाणशास्त्र' ही अभ्यासपद्धती विकसित केली. कॉ. शरद पाटलांच्या या तत्वज्ञानात्मक मांडणीला पूरक ठरणारे बौद्धिक कार्य सयाजीराव महाराजांनी बिनोयतोष भट्टाचार्य यांच्या माध्यमातून बडोद्यात आधीच करून ठेवले होते. बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायावरील अधिकारी पंडित म्हणून जगविख्यात असलेले बिनोयतोष भट्टाचार्य १९२४ ते १९५२ या काळात सुरुवातीला ३ वर्षे प्राच्यविद्या संस्थेच्या 'गायकवाड ओरिएंटल सिरीज'चे संपादक व नंतर बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेचे संचालक म्हणून एकूण २८ वर्षे कार्यरत होते. 'बडोद्याचे भट्टाचार्य' म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या बिनोयतोष यांच्या विद्वत्तेचा सन्मान म्हणून महाराजांनी त्यांना 'राजरत्न' व 'ज्ञानज्योती' या पदव्या दिल्या होत्या. भट्टाचार्य यांनी ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध धर्माच्या तुलनात्मक अभ्यासातून बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायाचे महत्व अधोरेखित केले. मध्ययुगीन हिंदू परंपरेतील शक्ती देवता आणि महायान पंथातील प्राज्ञ देवतांमधील साम्य त्यांनी शोधून काढले. पुढे कॉ.शरद पाटील यांनी याच दिशेने प्रवास करून तत्वज्ञानात्मक मांडणी केली.

**देवदत्त कदम, वारणानगर**
**मो. ८६९८६६८८०२**

महाराजा सयाजीराव व कॉ.शरद पाटील यांच्यातील सहसंबंध जाणून घेत असताना भारतीय मार्क्सवादाच्या इतिहासाचे आकलन अधिक स्पष्ट होते. १९१२ मध्ये अमेरिकेहून परतल्यानंतर भारताला पहिल्यांदा मार्क्सवादाचा परिचय करून देणाऱ्या धर्मानंद कोसंबींची अमेरिकावारी सयाजीरावांमुळेच शक्य झाली होती. म्हणजेच मार्क्स भारतात आणण्याला सयाजीरावांचा हातभार होता. त्याच मार्क्सवादाला भारतीय संदर्भात बौद्धिक आव्हान देणारा विद्वान घडवण्यात सयाजीरावांच्या बडोद्याचा सिंहाचा वाटा होता. हा भारतीय मार्क्सवादाचा 'बडोदाकेंद्री वर्तुळाकार' इतिहास आहे.

महाराजा सयाजीराव आयुष्यभर विविध विचारप्रवाहांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाद्वारे स्वतःची तत्वज्ञानात्मक भूमिका 'अपडेट' ठेवत राहिले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जातीच्या प्रश्नावर भूमिका घेण्यास नकार दिल्यामुळे कॉ.शरद पाटील यांनी १९७८ मध्ये 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' या सिद्धांतावर आधारलेल्या सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेवेळी कॉ.शरद पाटलांनी सुचवलेल्या आवश्यक मुलभूत सैद्धांतिक बदलांना विरोध करत 'अपडेट' होण्याचे नाकारल्यामुळे भारतीय कम्युनिस्ट चळवळ आज कोंडीत सापडली आहे. याउलट सयाजीरावांप्रमाणेच स्वतःची तत्वज्ञानात्मक भूमिका सातत्याने तपासत 'अपडेट' ठेवण्याच्या ध्यासाने 'पछाडलेल्या' कॉ.शरद पाटलांनी 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' या स्वतःच मांडलेल्या सिद्धांताला कालबाह्य ठरवत १९९६ मध्ये 'सौत्रांतिक मार्क्सवाद' या भारतातील सर्वात तरुण तत्वज्ञानाची मांडणी केली.

महाराष्ट्रावर हिमालयाइतके उपकार असणारे सयाजीराव महाराष्ट्रातील सामान्य जनता सोडा, इतिहास-समाजशास्त्राच्या अभ्यासकांनाही माहित नसावेत ही बाब महाराष्ट्राची बौद्धिक चिंता 'टोकदार' करणारी आहे. तर फक्त भारताच्याच नव्हे तर जागतिक तत्वज्ञान विश्वाला समतावादी समाजरचनेचे सर्वात तरुण तत्वज्ञान आणि जात्यंतक क्रांतीचा कृतीकार्यक्रम तयार करून देणारे एकमेव 'दार्शनिक' कॉ. शरद पाटील यांचाही 'पुरेसा' परिचय नाही. आपली 'महान' विद्वत परंपरा या दोघांबाबत कमालीचे आणि धूर्त 'मौन' बाळगते हे विशेष. बसता-उठता जातीअंताचा ढोल वाजवणाऱ्या आपल्या चळवळींचे 'खांदे'सुद्धा कॉ. शरद पाटलांच्या 'मुलभूत' तत्वज्ञानाचे 'ओझे' पेलण्यास असमर्थ आहेत. कॉ. पाटलांच्या आजच्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्राने महाराजा सयाजीराव आणि कॉ. शरद पाटील या दोन 'खऱ्या' क्रांतिकारकांचा जोड-इतिहास आपली 'सर्वंकष' कोंडी फोडण्यासाठी स्वीकारण्याचा संकल्प केला तर महाराष्ट्र बौद्धिकदृष्ट्या 'सुदृढ' आणि 'प्रवाही' होण्यासाठी ते फलदायी ठरेल.. **समाप्तः**


## कलार समाजाच्या पारंपारिक(मद्य) व्यवसायाचा सुध्दा सरकारने गांभीर्याने विचार करावा

माननीय प्रधानमंत्री श्रीमान नरेंद्रजी मोदी यांचा रविवारी दिनांक १७ सप्टेंबरला वाढदिवस होता.त्यानिमित्त कलार समाजा तर्फे हार्दिक शुभेच्छा! प्रधानमंत्री यांनी आतापर्यंत अनेक विकास कामांना गती दिली व आताही देत आहे.प्रधानमंत्र्यांनी वाढदिवसा निमित्त पारंपारिक कारागिर व शिल्पकारांसाठी १३ हजार करोडची पीएम विश्वकर्मा योजना लॉन्च केली.ही योजना पारंपारिक व्यवसायिकांना शंभर टक्के लाभदायक ठरेल यात तिळमात्र शंका नाही.या योजनेचे प्रधानमंत्र्यांचे जेवढे कौतुक कराल तेवढे कमीच आहे.या योजनेत १८ पारंपारिक व्यवसायाचे क्षेत्र आहेत.यामध्ये सुतार,नाव निर्माता,अस्त्र बनविणारे, लोहार,हथौडा व टूल किट निर्माता,ताला बनविणारे,सोनार, कुंभार, मूर्तिकार, मोची,राजमिस्त्रि,टोकरी/चटाई/झाडू निर्माता,जूट बुनकर, खिलौना निर्माता, नाव्ही,माळ बनविणारे, धोबी,दर्जी,मच्छ्या पकडण्याचे जाळ बनविणारे अशा प्रकारच्या समाजाच्या पारंपारिक व्यवसायाला पीएम विश्वकर्मा योजने अंतर्गत लाभ घेता येणार आहे.हा पारंपारिक व्यवसायिकांसांठी अत्यंत लाभदायी आणि संजीवनी ठरेल याचा मला पुर्ण विश्वास आहे. प्रधानमंत्र्यांना सांगु इच्छितो की कलार समाज हा मुळातच आदिवासी आणि मागासलेला समाज आहे. त्यामुळे आपल्या पारंपारिक मद्य व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या परिवारांची उपजिविका करीत असे.परंतु स्वतंत्र पुर्वकाळात भारतातील प्रत्येक समाजाने स्वतंत्र मिळवण्यासाठी कठोर परिश्रम व आपापल्या पद्धतीने प्रयत्न केले.कलार समाजाचा व्यवसाय मद्य बनवून विकने हा होता यावरच समाजबांधवांची उपजिविका होती.परंतु स्वतंत्र आंदोलनात दारूचा(मद्यचा) विपरीत परिणाम होवू नये.यासाठी महात्मा गांधींनी २४ मे १९३४ रोजी कलार समाजबांधवांना आग्रह केला की आपल्याला स्वातंत्र पाहिजे असेल स्वतंत्र मिळेपर्यंत आपल्या पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा लागेल. कारण याचा आंदोलकांवर विपरीत परिणाम होवू शकतो असे मला वाटते.पुर्वी महात्मा गांधींचा आदेश म्हणजे लक्ष्मण रेषा होती. त्यामुळे समाज बांधवांनी महात्मा गांधींना म्हटले की तुम्ही फक्त आम्हाला आदेश द्यावा तुमच्या आदेशाचे पुर्णपणे पालन होईल.तुमचा आदेश म्हणजे देशाचा आदेश असे आम्ही मानतो.कलार समाजाची दारूबंदी फक्त स्वतंत्रपुर्वकाळापर्यंतच होती.स्वतंत्र मिळाल्यानंतर कलार समाजाने आपला व्यवसाय पुन्हा पुर्ववत सुरू केला.परंतू हा व्यवसाय अत्यंत लाभदायक आहे असे राजकीय पुढाऱ्यांच्या व पुंजीपतींच्या लक्षात आले आणि कलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायावर कुर्हाड चालवीली व तेव्हापासून लायन्स (परवाना) पध्दती अमलात आली आणि स्वातंत्र्यानंतर कलार समाजाच्या व्यवसायाचे राजकारण झाले. **क्रमशः**



**रमेश लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.९९२१६९०७७९**

## शब्दकोडे-१८३



**आडवे शब्द**
१. पुरोगामी, आधुनिक विचारांचा ४. हिरव्या रंगाचा कीटक ७. साडेसातीचा अडीच वर्षांचा दुसरा टप्पा ९. काचेवरील ओरखडा १०. नित्यनेमाने केलेले वाचन ११. 'जगी हा खास वेड्यांचा --- माजला सारा' (रणदुंदुभी नाटकातील मा.दीनानाथ यांचे गाजलेले पद) १२. अडथळा, पाचर १३. आमदार-खासदारांनी घातलेल्या गोंधळासाठी रूढ झालेला शब्द १५. गंगाजल १७. कैकेयीची दासी १८. हिंदीत पैंजण २०. पहारा, रक्षण २१. अंतर्गत २२. साद २४. अनामिकेशेजारील बोट २४अ. धमनी, नाडी २५. बांबू २७. आठवड्यातील दिवस २८. तोल सांभाळण्याची कामगिरी ३०. पथारी ३३. नाहक, विनाकारण ३५. कार्तिकेयाच्या मुखांची संख्या ३६. शाहीराजवळचे वाद्य ३८. नाडी ३९. जिन्नस ४०. पद्धत ४१. एक प्रायश्चित कर्म ४२. चिंता ४४. कर्णाची उपाधी ४५. सगेसोयरे ४७. बहुपेडी साखळी ४८. वावडी, ऐकीव गोष्ट ५०. आभाळ ५१. अदृश्य ५४. पर्वत ५६. खण पण चोळीचा नव्हे ५७. पोपट ५९. बाणेदार स्त्री, जयश्री गडकर यांचा गाजलेला चित्रपट ६१. मृदंग ६३. लक्ष्मी ६४. कोर्टातील विरुद्ध पक्ष ६६. 'जैसे थे' परिस्थिती ६७. फटफजिती होईल असे ७०. बाण ७२. पाणी ओघळून जाईल असा उतार ७३. मुलगा, पुत्र ७४. एकत्रित भोजन ७५. नवलाची कामगिरी

**उभे शब्द**
१. गृहमंत्री सुनेच्या लेखी सासूबाई म्हणजे - २. प्रवाह ३. ललाट ४. दुर्लक्ष, हेळसांड ५. वाळवंट ६. अणकुचीदार ७. तोंड लपवून स्वदेश सोडण्याची वेळ आलेला ८. धनुष्यबाण ११. लुटालुट १२. हिंदीत काकडी १४. ताबडतोब पैसे मोजून १६. गौरवर्णी, साजिरी १८. स्तर १९. बारीकसारीक, किरकोळ २१. चूक, अवमान २३. उणीव, कमतरता २४. नव्या नोटेचा स्पर्श २६. काखेत मावणारी घागर २७. प्रशंसेचा उद्गार २८. सत्त्वयुक्त २९. त्वरित, अचानक ३१. हा प्रामाणिक असेल तर देशाची तिजोरी भरते ३२. गावभर स्वैर भटकणारी ३४. नातेवाईक ३७. मोबदला, परिणाम ४३. पाणी, आयुष्य ४५. हिंदीत अपवित्र ४६. कोट, किल्ला ४९. रममाण झालेला ५२. पावलोपावली, सतत ५३. पाच दिवस काम असेल तर हा देखील सुट्टीचा दिवस ५५. चांदोबाची सुट्टी! ५८. दागदागिने ६०. फार, खूप ६२. प्राप्ती, आवक ६५. घाव, प्रहार ६७. सोने ६८. उणीव पण न भासणारी ६९. राज्य ७१. ज्वाला, दाह

## शब्दकोडे १८२ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.प्रेमविवाह ५.अवसान
९.खडावा ११.वादळ
१२.पद १३.मरतुकडा
१४.मानपान १६.सरळकोन
१८.मखर २०.सुरमा
२२.घमघमाट २३.डाका
२४.सारंग २६.पावसाळा २८.नाना
३१.भरधाव ३२.जनगणना
३५.दया ३६.वर्तमानकाळ ३७.म
नोज ३८.सवंगडी ३९.तारका
४०.भर ४२.विट ४४.गवगवा
४६.रजई ४८.आभूषणकार
५१.जंग ५२.गनबोट
५४.भारवाहक ५६.गतकाल
५८.पास ६०.ताग ६१.न्यायालय
६३.देवालय ६४.नवीन
६७.कपबशी ६८.समरस
६९.कडकडाट ७०.साखर

**उभे उत्तर**
१.प्रेमळ २.विवाहसमारंभ
३.वाद ४.हळहळणे
५.अपमान ६.वदन ७.नमन
८.वितुष्ट ९.खडानखडा
१०.वाचाळ १५.पानमळा
१७.समाधानकारक १९.रकाना
२१.रसा २२.घसा २५.गरजवंत
२६.पाव २७.घण २९.नाराज
३०.उदरभरण ३२.जनता
३३.गळका ३४.नामदेव
४१.रज ४२.विष ४३.टणक
४४.गगन ४५.वाटा ४७.ईश्वर
४९.भूमीकन्या ५०.रजत
५१.जंगल ५३.टपाल ५४.भाग
५५.वाचावीर ५६.गय
५७.कालपट ५९.सय ६०.तास
६२.लचांड ६३.देशी ६४.नम
६६.नस ६७.कडा

## सुशिक्षित बेरोजगारांना संधी कधी मिळणार?

मात्र त्याच जिल्ह्यातील निवृत्त शिक्षकांना ज्याशाळेत शिक्षक नाहीत अशा शाळेवर हजर रहाण्यासाठी शिक्षण विभाग आदेश देतात. याला काय म्हणावे? आता तर काही ठिकाणी एक व्यक्ती एका ठिकाणी पूर्णवेळ अधिकारी पदावर काम करीत असताना सुद्धा त्यांना अन्य खात्याची जबाबदारी दिली जाते. मागे तर माझा एक मित्र सांगत होता की, एका व्यक्ती जवळ आठ खात्यांचा कारभार आहे. आता सांगा देशात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत असताना असा अतिरिक्त भार एकाच व्यक्तीकडे देणे योग्य वाटते का? मग सांगा सुशिक्षित बेरोजगारांना संधी कशी मिळणार. त्यांच्या कारभारामध्ये पारदर्शकता अशी येणार. यातून आर्थिक विकास होणार का? मग हंगामी भरती का? यामुळे आर्थिक विषमता वाढण्याला मदत होणार. यातून गरीब अधिक गरीब होत जाणार, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार ही वस्तुस्थिती आहे.

१ नोव्हेंबर,२००५ पासून शासकीय सेवेत लागणाऱ्या सेवकांना निवृत्ती वेतन नाही. मग सांगा शिक्षण घेऊन नोकरी करून सुद्धा म्हातारपणी कुणाचा आधार घ्यावा असा प्रश्न कायम त्यांना सतावत असतो. मग कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या सेवकांची काय दशा होईल, याचे वर्णन न केलेले बरे. तेव्हा सुशिक्षित बेकार आहेत. त्यांना आधार देणे आवश्यक आहे. याचा परिणाम दारिद्र्यरेषेखालील लोकांची सुद्धा संख्या वाढेल. तेव्हा राज्यातील राज्यकर्त्यांनी राज्यातील सुशिक्षित बेकारांकडे दुर्लक्ष करून विकास कामांकडे लक्ष देऊन राज्याचा विकास होणार नाही, तर राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांनी घेतलेल्या पदवीप्रमाणे किमान वेतन देणारा रोजगार त्यांना दिला गेला पाहिजे, तरच राज्याचा विकास होऊ शकतो.

एक शासकीय सेवक घर संसार सांभाळून गाव व पाहुणे मंडळी सांभाळीत असतात. इतकेच नव्हे, तर एखाद्याच्या सुखदुःखात एकमेकांना मदत करतात. पगार जरी पाच किंवा सहा अंकी असला तरी जवळ जवळ त्यातील तीस टक्के पगार शासन दरबारी जातो. उरलेल्या पगारात मुलांचे शिक्षण, घराचा हप्ता, आजारपण, कपडालत्ता आणि उत्सव वर्गणी मग आता शिल्लक किती? यात अनेक कर्जबाजारी झालेले दिसतात, तर काही व्यसनाच्या आहारी गेले. तेव्हा विकासासाठी प्रथम बेकारांना कामधंदा दिला पाहिजे. जर देता आला नाही तरी महागाईच्या निर्देशांकानुसार त्यांना बेकारी भत्ता दिला गेला पाहिजे. मग बघा कसा विकास होतो ते. राज्याच्या विकासासाठी कंत्राटी नोकरभरती फायदेशीर नाही, तर किमान वेतन देऊन नोकरीची शाश्वतीही देता आली पाहिजे. आज ज्या घरफोड्या व लुटमार होतात हे त्याचेच उदाहरण आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, देशात किंवा राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची क्रूर थट्टा चालली आहे. तेव्हा आपल्या राज्याच्या विकासासाठी हे चित्र बदलणे आवश्यक आहे. एक व्यक्ती एक पद,आरक्षणाची अंमलबजावणी आणि निवृत्तीनंतर निवृत्तिवेतन, तरच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळून आपला भारत देश बलवान होईल. त्यासाठी देशातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी मिळणे गरजेचे आहे. **समाप्तः**

**-रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

## येवला तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

**नाशिक ।** पावसाळ्याचे चार महिने संपत आले असून येवला तालुक्यात अद्यापपर्यंत नदी,नाले दुथडी भरुन वाहिले नाही. कधी तरी अल्प प्रमाणात पाऊस पडल्यामुळे प्रारंभीच्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरलेली सोयाबीन, बाजरी, मका आदी पिकांची वाढ न होताच पावसाअभावी ते जळून गेले. काही शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली तरी काहीच उपयोग झाला नाही.बी,बीयाणे,खतांसाठी केलेला खर्च वाया गेला. त्यामुळे येवला तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. विजेचा प्रश्न गंभीर झाला असून शेतीसाठी पूर्णवेळ विज देण्यात यावी,नागरिकांसह जनावरांना पिण्याचे पाणी,जनावरांना चारा उपलब्ध करणे अत्यंत कठिण होऊन बसले आहे. याबाबतीत राज्य शासनाने गांभिर्यपूर्वक लक्ष देऊन येवला तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहिर करावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशा मागणीचे निवेदन येवला तहसिलदार आबा महाजन यांना देण्यात आले.

# नाशिकच्या उद्योजकांना श्रीलंकेत उद्योगवाढीसाठी संधी

**श्रीलंकेचे उपउच्चायुक्त दोरायसमी वेंकटेश्वरनं यांचे आवाहन**

### आयमातील बैठकीत केले मार्गदर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिकच्या उद्योजकांना श्रीलंकेत उद्योग व्यवसाय वाढीसाठी नामी संधी आहेत. याबाबत काही अडचणी उद्भवल्यास चेन्नई येथील कार्यालयामार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन श्रीलंकेचे उपउच्चायुक्त दोरायसमी वेंकटेश्वरनं यांनी दिले.

श्रीलंकेत भारतीय उद्योजकांना व्यवसाय वाढीसंदर्भात असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी आयमा रिक्रिएशन सेंटरमध्ये आयोजित बैठकीत वेंकटेश्वरन बोलत होते. व्यासपीठावर आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, सरचिटणीस ललित बूब, सचिव योगिता आहेर, चेंबरचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, आयमाचे माजी अध्यक्ष विवेक पाटील, रवींद्र महादेवकर, रवींद्र झोपे आदी होते.

उद्योजकांचे हित जोपासण्याबरोबरच निर्यात वाढ व परकीय चलन मिळवण्यास आयमाचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. श्रीलंकेत कृषी, वस्त्रोद्योग आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात आपला उद्योग वृद्धिंगत करण्यास मोठ्या संधी असल्याचे वेंकटेश्वरन यांनी सांगितले असल्याने नाशिकच्या उद्योजकांनी या संधीचा अवश्य लाभ घेऊन आपल्या उद्योगाचा विस्तार करण्याचा अवश्य विचार करावा, असे आवाहन आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी आपल्या प्रास्ताविकात केले.

यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना वेंकटेश्वरन यांनी समर्पक उत्तरेही दिलीत. आयमाच्या शिष्टमंडळास श्रीलंका भेटीचे आमंत्रणही त्यांनी यावेळी दिले. संजय सोनवणे यांनी चेंबरच्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. आयमाचे सरचिटणीस ललित बूब यांनी आयमातर्फे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. रवींद्र झोपे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सुनील निफाडकर, कौस्तुभ याज्ञनिक, योगेश आंबेडकर, कृतिका महाजन, दृयाकुमार, मयूर शेलार, वेदांत कोतकर, निरंजन चोपडे, उमेश कोठावदे, योगेश देवरे, निखिल आहेर, अक्षय अथारे, सागर बोराडे, हर्षल कापडे, अनिल शिसव, आशिष मराठे, प्रयाग हलगी, रवी सामंत, किरण मेणे, देवेन्द्रप्रकाश विसा, गोविंद बागुल आदी उद्योजक उपस्थित होते.

# मोटारसायकली चोरणारे जेरबंद; आठ लाखांच्या दुचाकी हस्तगत

**नाशिक । वार्ताहर**

येथील पंचवटी गुन्हे शोध पथकास दोन दुचाकी चोरट्यांना ताब्यात घेण्यात यश आले आहे. या संशयितांकडून जवळपास आठ लाख ३० हजार रुपयांच्या एकूण १९ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिक शहरात वाढती दुचाकी चोरी बघता संबधित पोलिस ठाणे हद्दीतील गुन्हे उकल करण्याचे पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अनिल शिंदे यांनी गुन्हे शोध पथकाला मार्गदर्शक सुचना केल्या होत्या. गुरूवार (दि.१४) रोजी पंचवटी परिसरात गस्त घालत असताना एक दुचाकी चोर काट्या मारुती चौकात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी (झेश्रळलश) सापळा रचला होता. यावेळी संशयित राजू प्रकाश पिंपळे (वय ४०, राहणार बाजीराव गोदकर बस्ती, सनन हॉटेलच्या पुढे, शिर्डी, ता. राहता, जि. अहमदनगर) यास ताब्यांत घेतले असता विना नंबरप्लेट दुचाकी त्याचा साथीदार शोयब गफुर शेख (वय २४, राहणार नांदुर मध्यमेश्वर रोड शेख वस्ती) याच्यासमवेत अहमदनगर येथून चोरल्याची माहिती दिली. त्यानंतर या संशयितांची कसून चौकशी केली असता नाशिक शहर, औरंगाबाद, अहमदनगर येथून चोरल्याची कबुली दिली. यानंतर संशयित शोयब शेख यास देखील ताब्यात घेण्यात आले. या दोन्ही संशयितांकडून एनफिल्ड कंपनीच्या बुलेट ०४, बजाज कंपनीच्या पल्सर ०३, होंडा कंपनीच्या युनिकॉर्न ०३, होंडा कंपनीच्या स्पेल्डर ०६, इतर कंपनीच्या ०३ अशा एकूण १९ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. दरम्यान, सदरची कामगिरी पोलिस आयुक्त अंकुश शिंदे, परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, पंचवटी विभागाचे सहायक पोलिस आयुक्त नितीन जाधव, पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक रोहित केदार, मिथुन परदेशी, सहायक पोलिस उपनिरीक्षक अशोक काकड, वनवे, पोलिस हवालदार कुलकर्णी, गुंबाडे, कैलास कचरे यांनी संयुक्तपणे कामगिरी केली.

# हाय राईज सिरीज सारख्या तांत्रिक पद्धतीचा अवलंब करावा

### विजय सानप यांचे अभियंत्यांना आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



शहरात होत असलेल्या उंच इमारतींच्या कामाचा वेग बघता बांधकाम व्यावसायिक, आर्किटेक्ट व अभियंता यांनी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून आत्मसात करणे ही काळाची गरज आहे.

अभियंता दिनानिमित्त असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर इंडिया नासिक सेंटर व एसआरजे स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिनानिमित्त हॉटेल एक्स्प्रेस इन येथे 'हाय राईज बिल्डिंग' या विषयावर दोन चर्चासत्रात आयोजन करून साजरा करण्यात आला. अभियंता दिनाच्या निमित्ताने हाय राईज बिल्डिंगच्या संदर्भात या क्षेत्रातील विविध तज्ञांनी तांत्रिक माहितीपर व्याख्यान दिले. यावेळी शहरातील विविध बांधकाम व्यावसायिक, अभियंते तसेच वास्तुविशारद यांनी लाभ घेतला. प्रमुख पाहुणे म्हणून एसीसीईचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय सानप, राष्ट्रीय उपाध्यक्ष पुनीत राय उपस्थित होते. स्वागत एसीसीई नासिक सेंटरचे चेअरमन अनिल कडभाने यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून विजय सानप यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शहरातील होत असलेल्या उंच इमारतीं बनवताना आधुनिक तंत्रज्ञान सारख्या तांत्रिक व्याख्यान मालिकांची आवश्यकता असल्याचे विषद केले. अभियंता दिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणुन जिल्हा परिषदेच्या सीईओ आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रथम आलेले यशस्वी विद्यार्थी बी.ई.सिव्हील रुची चव्हाण, डिप्लोमा सिव्हिल:अथर्व गव्हाणे, एम.ई.स्ट्रक्चर रुचिता थोरात या विद्यार्थ्यांना शिवाजी खोडे मेमोरियल अकॅडमीक वॉर्ड देवून गौरविण्यात आले. एसीसीई नासिक सेंटरच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ सिव्हिल इंजिनिअर शिरीष लेले यांना प्रदान करण्यात आला. व्यासपीठावर सचिव अमित अलई, खजिनदार लिलाधर जावळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमास कमिटी सदस्य सचिन भागवत, निलेश भाटी, संदीप जाधव, मेघल पवार, रविंद्र धनाईत, संतोष काठे, ज्ञानेश्वर गोडसे, महेंद्र शिरसाट, नरेंद्र भुसे, सुयोग भोरे आदींनी परिश्रम घेतले.

## लासलगाव गटाचे प्रश्न मार्गी लावा

**नाशिक ।** लासलगाव गटाचे चे प्रश्न मार्गी लावण्यात यावे अशी मागणी दिशा समितीच्या अशासकीय सदस्या सुवर्णा जगताप यांनी नाशिक येथे झालेल्या दिशा समितीच्या बैठकीत केली. दिशा समितीची बैठक केंद्रीय आरोग्य मंत्री भारती पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली.या बैठकीत दिशा समिती अशासकीय सदस्या सुवर्णा जगताप यांनी लासलगाव गटाचे काही प्रश्न उपस्थित केले

लासलगाव येथील रेल्वे गेट नंबर १०५ मधील उड्डाणपुलाचे काम २०१६ पासून सुरू आहे परंतु शेतकऱ्यांकडे ८४ आर जमीन अधिग्रहण करण्याचे काम बाकी असून त्यांचे १ कोटी २७ लाख रुपये देण्याचे बाकी आहे.उड्डाणपुलासाठी रेल्वेने १५ कोटी अगोदरच खर्च केल्या असून शेतकऱ्यांचे राहिलेले पैसे देणे बाकी आहे. या सर्व मागण्या ना भारती पवार ऐकल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करून त्वरित ते प्रश्न मार्गी लावावेत असे निर्देश दिले.

# गॅस पाईपलाईनच्या खोदाईमुळे विद्युत पुरवठ्याचा खेळखंडोबा

**उपकरणांचे नुकसान; ठेकेदारावर गुन्हा दाखल करा**

### शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**



**माझा यापूर्वी तीन लाखांचा टीव्ही नादुरुस्त झाला. काल फ्रीज, गिझर, फॅन, सीसीटीव्हीसह इतर उपकरणे नादुरुस्त झालीत. इतर रहिवाशांचेही नुकसान झाले आहे. महापालिकेने लाखो रुपयांचे नुकसान भरून द्यावे, संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी.**
**- डॉ. सुनील चौधरी, प्रियंका पार्क**

गॅस पाईपलाईनच्या खोदाईमुळे प्रभाग २४ मध्ये विद्युत पुरवठ्याचा खेळखंडोबा झाला आहे. रविवारी पहाटे अनेक घरांमध्ये बल्बचे स्फोट होवून टीव्ही, फ्रीज, गिझरसह विद्युत उपकरणे नादुरुस्त झाली. नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. गॅस पाईपलाईन ठेकेदारावर गुन्हे दाखल करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने केली आहे. ऐन सणासुदीच्या काळात पुन्हा अशा घटना घडल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने दिला आहे. याबाबत महापालिका आयुक्त व शहर अभियंता यांनाही निवेदन देण्यात आले आहे.

गॅस पाईपलाईनसाठी खोदलेल्या रस्त्यांचे महापालिकेने काही दिवसांपूर्वी खडीकरण केले. आता त्यानंतरही गॅस पाईपलाईन ठेकेदारांकडून ठिकठिकाणी खोदाई केली जात आहे. यामुळे प्रभागातील अनेक भागात सतत विद्युत पुरवठा खंडीत होत आहे. शुक्रवारी, शनिवारी प्रियंका पार्क, जगतापनगर, कालिका पार्क भागात खोदाई करण्यात आली. विद्युत केबल खंडीत झाली. विद्युत दाब वाढल्याने रविवारी पहाटे तीन ते पाच वाजेच्या दरम्यान घरांमध्ये अचानक लाईटचे बल्ब, ट्यूब, सीसीटीव्ही स्फोट झाल्याने रहिवाशी भयभीत झाले. विद्युत पुरवठा खंडीत झाला. सोमवारीही हे दुरुस्तीचे काम वीज वितरण कंपनीकडून सुरूच होते. पाणी पुरवठ्यातही यामुळे अडथळा निर्माण झाला. अनेक रहिवाशांचे टीव्ही, फ्रीज, फॅन, गिझर, सीसीटीव्ही यासह विद्युत उपकरणे नादुरुस्त झाली आहेत. लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

महापालिकेच्या रस्त्यांचे, तसेच जनतेच्या विद्युत उपकरणांचे नुकसान केल्याप्रकरणी संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने केली आहे. अशी घटना पुन्हा घडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगीता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, विनोद पोळ, डॉ. सुनील चौधरी, राजेंद्र महाले, मुकुंद रनाळकर, डॉ. राजाराम चोपडे, अशोक पाटील, वंदना पाटील आदींनी दिला आहे. महापालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर, शहर अभियंता नितीन वंजारी यांना सोमवारी, १८ रोजी याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

## प्रतिज्ञा घेऊन गोदावरी नदी परिसराची स्वच्छता

नाशिक । स्वच्छता ही खरोखर सेवाच असून प्रत्येकाने स्वतपासून संपूर्ण स्वच्छतेचा संकल्प केल्यास प्रत्येक गाव व शहर स्वच्छ व सुंदर होणार आहे. स्वच्छतेच्या चळवळीत लोकसहभाग अतिशय महत्वाचा घटक असून स्वच्छता अभियानात सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. श्रमदान मोहिम राबवून सेवा दिवस साजरा करण्यात आला.

# पंतप्रधान मोदींच्या जन्म दिवसानिमित्त भाजयुमोतर्फे रक्तदान शिबीर

**नाशिक । प्रतिनिधी**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक शहरात भारतीय जनता युवा मोर्चा व जनकल्याण रक्तपेढी नाशिक यांच्या वतीने भाजपा कार्याल वसंतस्मृती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तरुणांनी स्वतः हून पुढाकार घेत रक्तदान केले. यावेळी भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाने महामंत्री सुनिल केदार, हिमगौरी आडके-आहेर, रोहीणी नायडु, मध्य विधानसभा निवडूणक प्रमुख अनिल भालेराव, प्रदेश क्रिडा प्रमुख विजय बनछोडे, जेष्ठ नेते कार्यालयीन चिटणीस अरूण शेंदुर्णीकर, प्रदेश महामंत्री योगेश मैंद, प्रदेश उपाध्यक्ष अनिकेत पाटील, उपाध्यक्ष निखिल पवार, प्रदेश कार्य. सदस्य विराज मुळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राहुल कुलकर्णी, युवा मोर्चा नाशिक महानगर अध्यक्ष सागर शेलार, निखिलेश गांगुर्डे, किरण गाडे-देशमुख, कमलेश पिंगळे, अनिल कांडेकर, अनिकेत सोनवणे, ऋषिकेश शिरसाठ, प्रसाद धोपावकर, अक्षय गांगुर्डे, गोपाल राजपुत, प्रथमेश नाईक, संतोष नेरे, विनायक कश्मीरे, शिवा जाधव, नरेंद्र पाटील, निलेश पवार, विक्रांत गांगुर्डे, विशाल पगार, अमित शुक्ल, प्रशांत मोराडे, विनोद येवले, भाविक तोरवणे, ओमकार लभडे, शेरा पगारे, सुमित गायकवाड, विजय गायखे, प्रणव भुसारे, सागर नागरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. मिलिंद राठी, अरूण कुलकर्णी, साईनाथ शेलार, नयन गोसावी, अमोल नेहे, वाल्मिक वाळुंज, सोपान घारे उपस्थित होते.

## रोटरॅक्ट क्लब ऑफ नाशिक स्मार्टसिटीतर्फे रक्तदान शिबीर

नाशिक । रोटरॅक्ट क्लब ऑफ नाशिक स्मार्टसिटीच्या वतीने गंगापूर रोडजवळ असलेल्या जनकल्याण रक्त पेढीमध्ये रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. रोट्रॅक्टर इशान दांग्रिकर यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**अ‍ॅड.सुरेश एम. वाघ**
**निशाणी नं. २०**

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. २६५/२०२३**

१) हरीष अनिरुध्द पाठक उ.व. ४६ धंदा - नोकरी
२) दिपक अनिरुध्द पाठक उ.व. ३३ धंदा - नोकरी
रा. अर्जदार क्र. १ व २, रा. साक्री
ह.मु. सी/३०४, विघ्नहर्ता सी. एच. एस. यशोधन नगर, ठाणे ता. जि. ठाणे **...अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** **...जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ व २ यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक १६/०८/२०२३ रोजी दि कि. अर्ज नं. २६५/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये मयत अनिता अनिरुध्द पाठक यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. ३०/०९/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ:- साक्री
दिनांक :- १६/०८/२०२३

शिक्का

**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय साक्री**

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय साक्री**

# ईद-ए-मिलादचा जुलूस २९ ला निघणार

### आ. देवयानी फरांदे यांच्या प्रयत्नाने पेच सुटला

**नाशिक । प्रतिनिधी**



यावर्षी अनंत चतुर्दशीनिमित्त गणपती विर्सजन मिरवणूक २८ सप्टेंबरला असून याच दिवशी ईद-ए-मिलादचाही सण आला आहे. या दोन्ही सणांचा मिरवणूक मार्ग एकच असल्याने मोठा पेच निर्माण झाला होता. मात्र मध्य नाशिक मतदार संघाच्या आमदार प्रा. देवयानी फरांदे यांच्या मध्यस्थीने पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या दालनात दोन्ही समाजातील मान्यवरांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत ईद-ए-मिलाद जुलुस दि. २८ ऐवजी २९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यास मुस्लिम समाजातील बांधवांनी मान्यता दिली आहे. आ.फरांदे यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे हा प्रश्न सुटल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

या बैठकीत ईसामोद्दिन खतीब ( शहर ए खतीब ), शेखन खतीब, हाफीज जफर, अबिब खान, तात्या शेख, वसीम पिरजादे व मुस्लीम समाजातील इतर मान्यवर तसेच गणेश उत्सव समितीचे अध्यक्ष समीर शेंटे, माजी महापौर विनायक पांडे, सत्यम खंडाळे, गणेश बर्वे, रामसिंग बावरी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

या समन्वय बैठकीत ईसामोद्दिन खतीब (शहर ए खतीब) यांनी घोषीत केले की, ईद-ए-मिलाद मिरवणूक (जुलूस) ईद-ए-मिलादच्या दुस-या दिवशी दि. २९ रोजी ३.३० वाजता आयोजित करण्यात येईल.

यावेळी पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलीस आयुक्त सिध्देश्वर धुमाळ, भद्रकालीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील आदी पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### धुळे शहरासह थाळनेर गावातून मोटारसायकल लांबवली

**धुळे ।** शहरातील गल्ली क्रमांक पाचमधून चंद्रशेखर नारायण गुजराथी यांची मोटारसायकल (एमएच १८ बीजे ८२५९) रात्रीतून चोरट्यांनी लांबवली. तसेच शिरपूर तालुक्यातील होळनांथे येथून जाकीर कादर खाटीक यांची मोटारसायकल (एमएच १८, बीयू ३२४१ ) चोरीस गेली. दोघा घटनांबद्दल आझादनगर थाळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### पिंपळादेवी विद्यालयात हिंदी दिन साजरा

**धुळे ।** शहरातील मोहाडी उपनगरातील श्री पिंपळादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदी दिन मुख्याध्यापक आर. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाने उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक के. आर. सावंत होते. प्रेरणा शिंदे व पियुषा पवार या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाप्रसंगी पर्यवेक्षक एस. एस. पाटील, ए. बी. बोरसे, डी.ए.देवरे,श्रीमती जे. एस. पाटील, श्रीमती जे. सी. पवार, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# तापी नदीच्या बॅक वॉटर मुळे अनेक गावात पिकांचे मोठे नुकसान

## नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील : आ. काशिराम पावरा

**शिरपूर । प्रतिनिधी**

तापी नदीच्या बॅक वॉटर मुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकरी बांधवांचे पिकांचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच तातडीने नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आमदार काशिराम पावरा यांनी सांगितले.



शिरपूर तालुक्यातील पिंप्री शिवारात तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये, शेती शिवारात १६ सप्टेंबर २०२३ रोजी मध्यरात्रीपासून अतिवृष्टी व हातनूर धरणाचे पाणी सोडल्याने तापी नदीतील पाण्यात प्रचंड मोठी वाढ झाली. तसेच बॅक वॉटर चे पाणी वाढल्याने तापी काठावरील शेत शिवारात सुमारे पाच ते दहा फूट पाणी २४ तास पेक्षा जास्त काळ साचून राहिले. १७ सप्टेंबर २०२३ च्या मध्यरात्रीपर्यंत तापी काठावरील अनेक गावांमधील शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून पिंप्री येथील अनेक शेतकरी, ग्रामस्थ यांनी शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा, प्रांताधिकारी प्रमोद भामरे, तहसीलदार महेंद्र माळी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून देण्याची मागणी केली आहे.

यापूर्वीच शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा यांनी तहसीलदार महेंद्र माळी यांच्याशी संपर्क साधून अधिकारी, कर्मचारी, तलाठी, सर्कल, कृषी अधिकारी, पिक विमा संबंधी अधिकारी यांना पंचनामे करून नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. शिरपूर आमदार कार्यालयात आमदार काशिराम पावरा यांना निवेदन देताना पिंप्री येथील सरपंच महेंद्रसिंग सिसोदिया, पंचायत समिती सदस्य विजय खैरनार, माजी सरपंच संजय धनगर, पोलीस पाटील जयपालसिंह गिरासे, माजी उपसरपंच किशोर पाटील, ग्रामपंचायत सदस्य मनोज राजपूत, रितेश राजपूत, लालसिंग धनगर, जितेंद्र पवार, महेंद्रसिंग गिरासे, केशव कोळी, प्रल्हाद राजपूत, आर. डी. पाटील, प्रवीण राजपूत, उत्तम कोळी, सावन भिल, सखुबाई भिल, बबनभाई कोळी, निलाबाई कोळी, भागाबाई होलर, सिंधुबाई सोमा, भिका कोळी, नवनाथ राजपूत, मनोज धनगर, अशोक धनगर, नामदेव खैरनार, गोटूसिंग राजपूत, योगेश राजपूत, मयूर गिरासे, हितेंद्र पवार, योगेंद्र गिरासे, शेतकरी बांधव उपस्थित होते.



# हस्ती स्कूल मुलींच्या खो - खो संघाची शालेय जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी कौतुकास्पद निवड

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा येथील १४ वर्ष आतील मुलींचा खो - खो संघ दि.११ सप्टेंबर २०२३ रोजी तालुका शालेय खो - खो स्पर्धेत सहभागी झाला होता. सदरची स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे यांचे तर्फे विकास विद्यालय नरडाणा येथे संपन्न झाली.

सदर स्पर्धेत हस्ती स्कूल मुली खो - खो पटूंनी तडफदार कामगिरी बजावली; व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. यास्तव त्यांच्या संघाची आगामी जिल्हा पातळीवर संपन्न होणाऱ्या शालेय खो - खो स्पर्धेसाठी कौतुकास्पद निवड करण्यात आली. यात पुढील खो - खो पटूंचा समावेश आहे. वैशाली पावरा, रोशनी पावरा, पूजा चौरे, नम्रता पावरा, अनुष्का पावरा, आरती महाले, जान्हवी पावरा, मनिषा पावरा, तमन्ना वळवी, प्रणिती पावरा, शालिनी पावरा, सुप्रिया पावरा. वरील खो - खो पटूंच्या संघाला हस्ती स्कूल क्रीडा विभाग प्रमुख प्रकाश खंडेराय, जितेंद्र सुरवाडे व खो - खो प्रशिक्षक हेमराज भामरे यांचे मार्गदर्शन लाभले. तर शालेय समिती चेअरमन कैलास जैन व आंतरराष्ट्रीय खो - खो पटू डॉ. आनंद पवार तसेच प्राचार्य हरिकृष्ण निगम यांनी कौतुक केले. हस्ती स्कूल दरवर्षी नियमितपणे अशा स्वरूपाच्या विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होणेस प्रेरित करते. याद्वारा विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त क्रीडा कौशल्यांचा विकास साधला जातो.

## पालेशा महाविद्यालयात युवती सभेची स्थापना

**धुळे ।** मा. ध. पालेशा महाविद्यालयात युवती सभेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या रेणुका बेलपाठक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले होते. प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले म्हणाले की, विविध क्षेत्रात महिला यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक आहे. भविष्यात महिलांना उच्च शिखर गाठण्याच्या भरपूर संधी आहे. या संधीचे त्यांनी सोने करावे असेही ते म्हणाले. यशस्वितेसाठी प्रा. डॉ. नेहा पाठक, प्रा. अश्विनी पाटील, प्रा. पल्लवी वाळके यांनी संयोजन केले.

# ॲड.मोरे यांची सहा.सरकारी अभियोक्ता पदावर निवड

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत सरकारी अभियोक्ता पद वर्ग १ ची परीक्षा २०२२ मध्ये झाली होती. सदर एमपीएससीच्या परीक्षेचा रिझल्ट नुकताच जाहीर झालेला आहे. या परीक्षेमध्ये धुळे जिल्हा न्यायालयात कार्यरत असलेले विधीतज्ञ योगेश रामचंद्र मोरे यांची सहायक सरकारी अभियोक्ता पदावर स्तुत्य निवड झालेली आहे.



सदर वर्ग १ च्या पदाच्या निवडीसाठी लेखी परीक्षेसाठी लेखी परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यामुळे ते मुलाखत परीक्षेसाठी पात्र ठरले. त्यानंतर लेखी परीक्षा आणि मुलाखत तोंडी परीक्षेमध्ये एकत्रित चांगले गुण संपादित केल्यामुळे ते एमपीएससी परीक्षा होवून त्यांची अंतिम सिलेक्षण यादीमध्ये निवड झालेली आहे. ॲड.योगेश रामचंद्र मोरे यांचा सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्म झालेला आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण गिंदोडिया प्राथमिक विद्यामंदिर, धुळे तसेच माध्यमिक शिक्षण सातपुडा हायस्कूल, धुळे येथे झाले.गंगामाई कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नगांव, ता.जि.धुळे येथुन एम. ए. उत्तीर्ण झाले. कायद्याचे शिक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर विधी एल. एल. बी झाले. ॲडव्होकेट म्हणून त्यांनी २००९ मध्ये धुळे जिल्हा न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली. त्यांना सिनियर विधीज्ञ कुंदन पवार यांचे बहुमोल विशेष मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे ॲड.संतोष केदार आणि जेष्ठ विधीज्ञ जगदीश पगारे यांचे देखील वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. ॲड.प्रफुल्ल चित्ते,ऍड झेड के पवार,ॲड. तिर्थदास अमृतसागर ,ॲड. बाविस्कर, ॲड. नीलेश अहिरे, ॲड. सागर जैन, ॲड. संतोष ठाकूर, ॲड विकेश बागुल, सहायक सरकारी अभियोक्ता महाले, भाऊसाहेब महाजन, ॲड शशी पाटील, ॲड सतिष अहिरे आदी शुभेच्छा दिल्या.

# एक कोटीचा हस्तगत मुद्देमाल तक्रारदारांना परत

**पोलिस महानिरीक्षक बी. जी. शेखर पाटील यांच्या हस्ते कार्यक्रम**

**धुळे । प्रतिनिधी**

विविध गुन्ह्यांत जिल्हा पोलिसांनी हस्तगत केलेला सुमारे एक कोटीचा मुद्देमाल नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक बी. जी. शेखर पाटील यांच्या हस्ते संबंधित तक्रारदारांना परत करण्यात आला. येथील पोलिस कवायत मैदानावर पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल हस्तांतर सोहळा झाला.



जिल्ह्यात दाखल दरोडा, जबरी चोरी, घरफोडीसारख्या विविध गुन्ह्यांतील तक्रारदारांचे चोरी झालेले सोन्या-चांदीचे दागिने, रोकड, दुचाकी, चारचाकी, ट्रॅक्टर, ट्रॉली, शेतीपयोगी औजारे आदी मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखा व स्थानिक पोलिस ठाण्यांनी तपास करून गुन्हे उघडकीस आणले. गुन्ह्यातील आरोपींकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. शेखर पाटील, पोलिस अधीक्षक संजय बारकुंड यांच्या संकल्पनेतून जिल्हा पोलिस दलाने जप्त केलेला हा मुद्देमाल तक्रारदारांना परत करण्यासाठी पुढाकार घेऊन न्यायालयात यासाठी पाठपुरावा केला. तक्रारदारांना मुद्देमाल परत देण्याचे आदेश प्राप्त करून घेतले. त्यानंतर हा मुद्देमाल तक्रारदारांना हस्तांतर करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात तक्रारदारांना विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. शेखर पाटील यांच्या हस्ते सुमारे एक कोटी ९२ हजार ६२२ रुपयांचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे. या वेळी तक्रारदारांनी जिल्हा पोलिस दलाचे आभार मानले. अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे यांनी प्रास्ताविक केले. पोलिस अधीक्षक बारकुंड, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. शेखर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. वाहिदअली सय्यद यांनी सूत्रसंचालन केले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांनी आभार मानले.

# विसपूते विद्यालयातील मुलींचा व्हॉलीबॉल संघ विजयी

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा क्रिडा कार्यालयाच्या वतीने दरवर्षी शालेय क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जात असते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी तसेच आवडीचा क्रिडा प्रकार जोपासण्यासाठी खेळांचे महत्व पटवून देणे महत्वाचे असते. निरोगी शरीरातूनच निरोगी मन व बुद्धीचा विकास होतो. विद्यार्थ्यांना मैदानी खेळ खेळण्यासाठी नेहमीच आमच्या विद्यालयात प्रोत्साहन दिले जाते.

विद्यालयातील विद्यार्थीनींनी नुकतीच गरूड मैदान या ठिकाणी झालेल्या व्हॉलीबॉल च्या अंतिम सामन्यात अकलाड मोराणे येथील मुलींच्या संघाचा पराभव करून जिल्हास्तरासाठी निवड झालेली आहे. या संघात कु. भाविका मोहीते, अंकिता मोरे, रोशनी अहिरे, रूपाली आडगळे, कविता पाटील यांचा समावेश होता. त्यांना क्रीडाशिक्षक श्री एस. बी. भदाणे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाला संस्थेचे अध्यक्ष मा. नानासाहेब महेंद्रजी विसपूते, संस्थेच्या सचिव स्मिताताई विसपूते व प्राचार्य श्री पी. बी. पाटील यांनी अभिनंदन करून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील २७ परिचर यांना व्रणोपचारकपदी पदोन्नतीने पदस्थापना

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा, पशुसंवर्धन विभागातील परिचर पदावर असणाऱ्या २७ कर्मचाऱ्यांना व्रणोपचारकपदी पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत समुपदेशनाने जिल्हा परिषदेच्या कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात पदोन्नती प्रक्रिया पार पडली. दिव्यांग कर्मचारी महिला कर्मचाऱ्यांना समुपदेशनावेळी प्राधान्य देण्यात आले.

समुपदेशनाने पारदर्शकरितीने पदोन्नती प्रक्रिया पार पाडल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचे पुष्पगुच्छ देऊन संबंधित कर्मचाऱ्यांनी आभार व्यक्त केले. परिचर पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ दिल्याने त्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधिल परिशिष्ट १२ अ.क्र. (७) नुसार परिचर (गट ड) यांना व्रणोपचारक (गट ड) या पदावर सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मैट्रिक्स मधील वेतन स्तर एस-३, रूपये १६६०० ५२४००) मध्ये तात्पुरत्या स्वरूपात दिनांक १५/०९/२०२३ अन्वये पदोन्नतीने एकुण २७ कर्मचाऱ्यांना परिचर (गट ड) यांना व्रणोपचारक (गट ड) या पदावर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडून मंजूर करून निर्गमित करण्यात आले.

या संपूर्ण प्रक्रियेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भालचंद्र चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) रवींद्र परदेशी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी योगेश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रशासन अधिकारी वृषाली पाटक, कनिष्ठ प्रशासन अधिकारी हेमंत मंडलिक, कनिष्ठ सहाय्यक ज्ञानेश्वर पवार यांनी मेहेनत घेतली. दिव्यांग कर्मचारी महिला कर्मचाऱ्यांना समुपदेशनावेळी प्राधान्य देण्यात आले.

# चिमठाणे येथे बकरी पोळा उत्साहात साजरा



**चिमठाणे । प्रतिनिधी**

चिमठाणे येथे सालाबादाप्रमाणे यावर्षी देखील बकरी पोळा साजरा करण्यात आला. बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी प्राण्याविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करत हा सन साजरी करण्यात येतो. या सणामध्य सर्व मेंडपाल बांधव आपल्या शेड्या मेंड्या घेऊन एकत्रित येतात त्यात धनगर समाज, कोळी समाज, आदिवासी समाज एकत्रित येत ढोल ताश्याचा गजरात हा उत्सव मिरवणुक काढत असतात. यामध्ये गावातील तरुण देखील सहभागी होत आनंद घेतात.

# आ.पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नगाव,साक्री येथे फळ व बेबी किट वाटप

**धुळे । प्रतिनिधी**

शेतकरी,गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेसाठी आ.कुणाल पाटील यांनी कार्य केले आहे. विकास कामांसोबतच लोकांच्या वैयक्तीक लाभाची कामे व समस्याही सोडविण्याचे काम त्यांनी केले आहे.असे प्रतिपादन बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील यांनी नगाव येथे आ.पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित एका कार्यक्रमात केले.





धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने दि. १८सप्टेंबर रोजी धुळे जिल्हयात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. नगाव ता.धुळे तसेच साक्री शहरात फळवाटप आणि बेबी किटचे वाटप करण्यात आले. नगाव ता.धुळे येथील नवजीवन विद्या विकास मंडळाच्या वृध्दाश्रम व मुकबधिर विद्यालयात फळवाटप झाले. तसेच नगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील गरोदर मातांनाही फळवाटप करण्यात आले.यावेळी झालेल्या कार्यक्रमात बाजार समितीचे उपसभापती योगेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विशेष कार्यअधिकारी प्रकाश पाटील, नगाव येथील भटू राजधर पाटील, राजेंद्र पाटील, प्रणव पाटील, जगन्नाथ बैसाणे, योगेश पाटील, लालू पवार, नानाभाऊ भिल, सुरेश पाटील, शिवाजी पवार, मनोहर ठाकूर, अशोक बैसाणे, देवा सोनार, नाना थोरात, जगदिश पाटील, अरुण पाटील, विनोद पाटील, प्रभाकर चंद्रा, किशोर पाटील,नंदु भामरे,शिवदास पाटील, आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते भटू सुभाष पाटील यांनी केले होते. दरम्यान आ.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन साक्री ग्रामीण रुग्णालयात साक्री तालुका कॉग्रेस व युवक काँग्रेसच्यावतीने बेबी किट वाटप आणि फळवाटप कार्यक्रम झाला.यावेळी साक्री तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष दिपक साळुंके, युवक काँग्रेस अध्यक्ष सागर देसले,साक्री शहर युवक काँग्रेस अध्यक्ष प्रज्योत देसले, केतन साळुंके शेवाळी, शेवाळी माजी सरपंच दगाजी साळुंके,गौरव सोनवणे,जुबेर खान, याकूब खान पठाण, शाहरुख पठाण, फैजल पठाण तोहिद खाटीक, गोलू सोनवणे आदी उपस्थित होते.

# रक्तदानाने अभियंता दिन साजरा

**धुळे । प्रतिनिधी**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे तंत्रनिकेतन तर्फे अभियंता दिन महाविद्यालयात सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले व नंतर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा प्रमोद कचवे, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पश्चिम विभागीय अध्यक्ष सुनील मुंदडा, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेचे अध्यक्ष दिपक अहिरे, सचिव आशिष अग्रवाल, संजय पाटील, कुणाल सोनार, राकेश कापडे, आशुतोष पाटील, प्रा संजीव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य प्रमोद कचवे यांनी रक्तदान शिबीराच्या आयोजनाबद्दल बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेचे अभिनंदन केले व उपस्थित भावी अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सचिव आशिष अग्रवाल यांनी आभार मानले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





बुधवार, दि. २० सप्टेंबर २०२३

# धुळ्यात धुमधडाक्यात बाप्पाचे स्वागत

## बाजारपेठ गजबजली; सर्वत्र चैतन्याचे वातावरण























धुळे । सकाळपासूनच
गणेशमूर्ती आणि पूजेच्या साहित्य खरेदीसाठी दिवसभर शहरातील बाजारपेठेत झुंबड उडाली होती. आग्रा रोड, फुलवाला चौक, साक्री रोड तसेच मंडळांच्या कार्यकर्त्यांनी गणेशमूर्ती नेण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रक, टेम्पो आदी वाहनांतून बाजारात आले होते. अनेक मंडळांनी साऊंड सिस्टीमसह आकर्षक सजावट करून मिरवणुका काढल्या.तृतीयपंथीयांनी देखील गणेशमुर्तीची वाजत-गाजत मिरवणूक काढली. श्री गणेश मुर्तीची स्थापना झाल्यानंतर विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर आरतीही करण्यात आली. एकविस मोदकांचा नैवेद्य गणरायाला अर्पण करण्यात आला. त्यानंतर सर्वांनी नैवेद्य प्रसाद म्हणून ग्रहण केला. प्रत्येक घरात पारंपरिक पद्धतीने तसेच प्रत्येकाच्या रुढीनुसार दीड, पाच, सात, नऊ, अकरा दिवस असा गणेशोत्सव साजरा होणार आहे. तर सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. पोलिस प्रशासनेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून चोख बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळ पासूनच पावसाने उघडीप दिल्याने भाविकांना दिलासा मिळाला. तसेच श्री गणेश मूर्ती घरी आणताना होणारी तारांबळ टाळता आली. त्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पुढील ११ दिवस शहरासह जिल्हयाभरात गणेशोत्सवाचा उत्साह राहील. पाच हजारावर घरांमध्ये शाडू मातीचे बाप्पा- पर्यावरणाच्या संवर्धनासाठी यंदाही अनेक नागरिकांकडून शाडू मातीच्या मूर्ती खरेदीला प्राधान्य दिले जात होते. शाडू मातीच्या अनेक आकर्षक मूर्ती बाजारपेठेत सहज उपलब्ध होत असल्याने यंदा गणेशोत्सवात शाडूच्या गणपती मूर्तींचाच अधिक बोलबाला असल्याचे चित्र दिसत होते. किंमत अधिक असतांनाही सुमारे पाच हजारावर घरांमध्ये शाडु मातीच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील २१ गावांमध्ये यंदा एक गाव एक गणपती उपक्रम राबविण्यात आला. त्यात सर्वाधिक ५ गावे शिरपूर तालुक्यातील आहेत. तसेच नरडाणा, थाळनेर,निजामपूर परिसरातील प्रत्येकी तीन गावांचा समावेश आहे.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





# धुळ्यात गणरायाचे जल्लोषात स्वागत

## सार्वजनिक मंडळांसह घरोघरी बाप्पा विराजमान




























धुळे । विघ्नहर्ता गणपती बाप्पा मोरया, मंगलमुर्ती मोरया' च्या जयघोषात जिल्ह्यात ६०७ ठिकाणी सार्वजनिक तर घरोघरी गणेशमूर्तींची ढोलताशे, डफ आणि डिजेच्या गजरात मिरवणूक काढून मोठ्या जल्लोषात स्थापना करण्यात आली. तर धुळे शहरातील मानाचा खुनी गणपतीची पारंपारीक वाद्यात मिरवणूक काढण्यात आली. तसेच विधिवत पूजन करण्यात आले. गणेशोत्सवाला प्रारंभ झाल्याने सर्वत्र भक्तिमय वातावरण तयार झाले आहे. या आनंदोत्सवात लहान थोर दंग झाल्याचे चित्र सर्वत्र पहायला मिळत आहे. गणेशोत्सवाची तयारी गेल्या महिन्याभरापासून सुरु होती. श्रावण महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात तयारीने आणखीनच वेग घेतला. अखेर भाद्रपद शुध्द चतुर्थीला म्हणजेच मंगळवारी गणरायाची भक्तीमय वातावरणात घराघरात स्थापना करण्यात आली. गणेश चतुर्थीच्या दिवशी होणारी तारांबळ टाळण्यासाठी काहींनी रविवारी तर सोमवारी जणांनी काल, सोमवारी श्री गणेश मूर्ती घरी आणून ठेवल्या होत्या. सकाळपासूनच गणेशमूर्ती आणि पूजेच्या साहित्य खरेदीसाठी दिवसभर शहरातील बाजारपेठेत झुंबड उडाली होती. आग्रा रोड, फुलवाला चौक, साक्री रोड तसेच मंडळांच्या कार्यकर्त्यांनी गणेशमूर्ती नेण्यासाठी ट्रॅक्टर, ट्रक, टेम्पो आदी वाहनांतून बाजारात आले होते. अनेक मंडळांनी साऊंड सिस्टीमसह आकर्षक सजावट करून मिरवणुका काढल्या.तृतीयपंथीयांनी देखील गणेशमुर्तींची वाजत-गाजत मिरवणूक काढली. श्री गणेश मुर्तींची स्थापना झाल्यानंतर विधिवत पूजन करण्यात आले.

संकलन : दिपक वाघ